# प्रकरण पहिले

## महाराष्ट्रातील संत परंपेचा आढावा घेवुन त्यात असलेले संत तुकारामांचे स्थान व त्यावेळच्या समाजाची पार्श्वभूमी

संतपरंपरा आढावा:—

ज्ञानेश्वरांना मराठी साहित्याची अविच्छिन्न परंपरा निर्माण केली व महाष्ट्रातील लोकजीवनाला सांस्कृतिक अधिष्ठान मिळवून दिले.

एकनाथ शांत व क्षमाशील होते पण तुकाराम तर न्याय निष्ठुर आक्रमक होते धांमिकतेवर कठोरपणे कोरडे ओढून त्यांनी आपल्या अभंगात सर्वत्र भक्ति आणि भूतदया, परमार्थ आणि परोपकार यांचा मिलाफ घडवून आणला.

एकनाथाची भूमीका :— पैठणसारख्या सनातन्यांच्या बालेकिल्यात त्यांनी भागवतधर्माची विजयपताका फडकावली कर्मठांच्या राजधानीत स्त्री शुद्राचा कैवार घेवून त्यांनी देशभाषेचा आवर्जुन पुरस्कार केला. व महाराष्ट्राच्या विचारसंपदेत अमोलिक भर घातली. एकनाथ हे महाराष्ट्रातील उदारमतवादाचे व नेमस्त संप्रदायाचे जनक होत त्यांचा जीवनक्रम म्हणजे समन्वयवादाचा एक उत्कृष्ट आदर्श होय.

गृहाश्रमू न सांडिता । कर्मरेखा न ओलांडिता।।
निजव्यापारी वर्तता । बोधु सर्वथा न मैळें ।

या तत्वाचे स्वतः आचरण करून त्यांनी प्रपंच व परमार्थ यांची कुशलतेने सांगड घातली.

बाहेरी कर्मे क्षाळला। भीतरी ज्ञाने उजळला ।

अशा संसारी भक्तींचे एकनाथ हे मुकूट मणी होते. आचाराची शुद्धता राखुन त्यांनी कर्मठतेचे बंड मोडले.

नामदेव :— ज्ञानेश्वर प्रणीत भागवत धर्माचा संदेश गावोगावी नेवून पोहचवण्याचे कार्य नामदेवांनी केले म्हणुनच ते वारकरी परंपरेचे आद्य प्रचारक होते.

ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्र शारदेच्या मंदीरात जो ज्ञानदीप प्रज्वलीत केला. त्याच्या ज्योतीवर असंख्य दिपीका उजळवून समाज जीवनातील अंधकार नाहीसा करून टाकण्याची ज्ञामदेवाची महत्वाकांक्षा होती.

नामदेवांनी आपल्या ऐंशी वर्षाच्या दीर्घायूष्यात मोठया निष्ठेने व तन्मयतेने वारकरी पंथाचा प्रचार करून बहुजन समाजाच्या सुप्त आकांक्षा जागृत केल्यात्यासाठी

त्यांनी आपल्या कार्याला साजेसे प्रचारतंत्रहि त्यांनी शोधुन काढले.

ज्ञानेश्वरांचा अद्वैत सिद्धांत जरी त्यांच्या अध्यात्मश्रवण बुद्धीला पटला तरी त्यांच्या हळुवार व श्रद्धाळु मनाने सगुणपासनेचा छंद घेतला.

आपल्या आत्यंतिक भक्तिभावाने नामदेवांनी केवळ विठ्ठललाच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राला वेड लावले. नामसंकीर्तनाच्या तंद्रीत देहभान हरवुन ते चंद्रभागेच्या वाळवंटात नाचु लागतात खेडयापाडयातून त्यांच्या अभंगवाणीचे पडसाद घुमू लागले.

त्यांच्या सहजस्फूर्त उद्‌गारात शुद्रातिशुद्रांना आपल्या अंतकरणाची ओळख पटली. सावता माळी, नरहर सोनार, जगतमित्र नागा, चोखामेळा वगैरे संत नामदेवांच्या सुरात सुर मिसळून गाऊ लागले.

नामदेवांना पुस्तकी विद्येचा स्पर्श नव्हता. नामदेवांच्या मुत्युनंतर वारकरी पंथाचे कार्य स्थगित झाले एकनाथांनी आपल्या कर्तृत्वाने व वाङ्‌मयाने त्याला पुन्हा चालना दिली. त्यांच्या वाङ्‌मयात साहित्य गुणांची तर वाण नव्हतीच पण त्याचा नुसता विस्तार जरी पाहयला तरी आश्चर्याने मन थक्क होते.

एकनाथ हे क्षमाशील संतच नव्हे तर युगप्रर्वतक विचारवंत होते.

वारकरी परंपरेचे मुकुटमणी तुकाराम यांनी एकनाथांचे कार्य आधिक उत्कटतेने व तेजस्वितेने पुढे चालु ठेवले. एकनाथांनी तडजोडीचा मार्ग स्वीकारला तर तुकारामांचे धोरण आक्रमक राहीले.

तुकारांमाच्या काळात शिवकालीन राजकीय आंदोलनास नुकताच प्रारंभ झाला होता. त्यामुळे उच्चवर्णीयांच्या जीवनात स्वभिमानांच्या महत्वकांक्षेच्या व प्रतिकाराच्या लाटा उसळू लागल्या होत्या. परंतु खेडयापाडयातील सर्वसामान्य जनतेचे जीवन या

राजकीय घडामोडीपासून बहुधा अलिप्तच हाते. भागवत धर्माने वर्णाश्रम धर्माच्या चौकटीला बाधा येवु न देता त्यांना आत्मविकासाचा एक स्वतंत्र मार्ग दाखविला त्यात जन्मसिद्ध अधिकाराचे व उच्चनीचतेचे बंड नसल्यामुळे हा पंथ पुष्कळच लोकप्रिय झाला.

तुकारामांनी आपल्या वाङ्‌मयाद्वारे या पंथाची शिकवण समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यंत पोहचविल्याची शिकस्त केली त्यांच्या वाङ्‌मयात आत्मप्रचितीचा ओलावा आहे भावनोत्कटतेचे सामर्थ्य आहे. सामाजिक अन्यायाची चीड आहे आणि मानवतेबद्दलची श्रद्धा आहे.

ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला तत्वज्ञान दिले, नामदेवांनी भक्तिची पताका फडकाविली. एकनाथांनी तत्व आणि तपशील विचार आणि आचार यांचा मिलाफ घडवून आणला.

ज्ञानाशिवाय भक्तीला डोळसपणा नाही, आचाराशिवाय तिच्यातील जडता नाहीशी होत नाही. परंतू या तिन्ही प्रवृत्ती एकवटून त्यांची सामाजिक नितिमत्तेत परिणीती झाल्याशिवाय मानवी जीवनाला पूर्णता नाही म्हणुन तुकारामांनी आपल्या अभंगातुन समाजकंटकाची यथोचित संभावना करून चिरंतन नीतीमुल्यांची जोपासना केली आणि ज्ञानेश्वर प्रणित भागवतधर्माच्या देवालयावर कळस चढविला.

लौकिक जीवनातील आपापली कर्तव्ये यथासांग पार पाडीत असताना आत्म्याची अलिप्तता ढळू न देणे हेच आपल्या आध्यात्मिक जीवनाचे अंतिम साध्य आहे. त्यामुळे बाहय जीवन व आंतर जीवन यांचा स्वाभाविक संबंध सुटतो.

बाहय सृष्टीत प्रंचड कोलाहल माजला तरी मनशांतीत बिलकूल बिघाड होत नाही त्यामुळे परिस्थितीत आमुलाग्र बदल घडवून आणण्याची यातायात न करता बाहयतः तिच्याशी जुळते घेण्याची व तत्वतः तिच्याबद्दल उदासीन राहण्याची प्रवृत्ति पोसली जाते. संतचळवळीत हीच मुलभुत प्रवृत्ति प्रतिबिंबित झालेली आहे.

शास्त्रीय शोधाच्या अभावी बाहय सृष्टीवर प्रभुत्व गाजविल्याची उमेद जोपर्यंत मानवात नव्हती तोपर्यंत त्याच्या व्यक्तिविकासाला आध्यात्मिक अधिष्ठानाची निःसंशय

गरज होती. म्हणुन ज्ञानेश्वरादिकांनी महाराष्ट्रातील लक्षावधी लोंकाच्या निःसत्व जीवनक्रमाला अध्यात्मज्ञानाची जोड मिळवून दिली. त्यामुळे त्यांना आपल्या दुःखाचा विसर पडला नाही. तर आपल्यातील सुप्त शक्तिची व भावनांची जाणीव झाली.

पराभूतपणाची वृत्ति नाहीशी होवून प्रतिकुल परिस्थितीला कणखरपणे तोंड देण्याची त्यांच्या मनाची तयारी झाली. नुसत्या नामसंकीर्तनाचा प्रचार करून संत थांबले नाहीत तर आपल्या आचरणाच्या व ग्रंथाच्यांद्वारे अंतःशुद्धी, कर्तव्यनिष्ठा, भूतदया, क्षमाशीलता, परोपकार, इत्यादी दैवी गुणांची त्यांनी जोपासना केली. यांनी कर्मठपणाचे बंड मोडले पण कर्मप्रवृत्तीचा नाश केला नाही. त्यांनी पढिकतेचा निषेध केला पण डोळसपणाचा आग्रह सोडला नाही. त्यांच्या भागवत धर्मात विवेक व नीती यांना फार मोठे स्थान आहे.

सामाजिक विषमतेमुळे निर्माण झालेला बहुजन समाजातील न्यूनगंड नाहीसा करून त्याच्या प्रगतीला उपकारक होतील अशी नवी मुल्ये प्रचारात आणण्याची त्यांची खटपट होती.

सनातनी पंडितांचा विरोध त्यांनी शांतपणे सहन केला पण आपल्या मार्गातून ते रेसभरही ढळले नाहीत.

" एक तठस्थ मानसी । एक सहजसि आळशी ।
दोन्ही दिसती सारखी वर्म जाणे तो पारखी ।

हे तुकारामांचे वचन सनातनी पंडित व संत यांना ओळखण्यासाठी उपयोगाचे आहे.

संत चळवळ ही सामाजिक लढयापासुन लोकांना परावृत्त करणारी प्रतिगामी शक्ती नसून धार्मिक जीवनाच्या कक्षेत त्यांच्या हक्कासाठी सनदशीरपणे झगडणारी सुधारणाबादी प्रवृत्तिच होती. १

संत कोणत्याही धर्माचे पंथाचे वा उपपंथाचे असोत त्यांच्या साधुत्व गुणांचे सूत सर्वसाधारण असते त्यांच्या व्यक्तित्वाचा प्रभाव राजकीय पुरूषांच्या व्यक्तिप्रमाणे

मर्यादीत नसतो अनेक राजकीय पक्षांच्या उदय होतो आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या कर्तृत्वाचा अस्तही होतो. इतिहासला त्यांच्या कर्तृत्वाचा शोध घ्यावा लागतो.

परंतु संताच्या कार्याचा प्रभाव जनसाधारणाच्या मनावर पिढयान पिढया टिकून राहतो किंबहुना सातत्याने वाढतच जातो. ईश्वर, जीव आणि जगत या विषयाचे त्यांचे गुढ ज्ञान, समाजाविषयीची त्यांची तळमळ, त्यांचे सौजन्य आणि साहिष्णुता या गुणामुळे त्यांची विभुती विश्वात्मक आकार घेते असे असूनही संत लोक स्वतःकडे अमानित्वाच्या भावनेतून पाहतात. आणि त्यामुळे त्यांच्या व्यक्तित्वाला आधिकच उजाळा प्राप्त होतो. आणि तो इतर प्राण्याहून निराळा ठरतो. समाजातील जीवन संघर्षात ही माणुसकी सतत टिकून राहतेच असे नाही. स्वार्थ परायणता वाढली द्वैत बुद्धी जागुत झाली आणि अहंकार बळाऊ लागला म्हणजे माणुस माणुसकीपासून दुरावू लागतो. आणि स्वपरघातकी वृत्तिने वागु लागतो. अशावेळी अवनीतीला गेलेली माणुसकी सुधारण्याकरता इश्वराचे अधिष्ठान घेवून प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या ज्या व्यक्ती पुढे येतात त्या संतत्व पावतात लौकिक आणि पारलौकिक जीवनाचा उद्धार करण्यासाठीच ते आपले सारे जीवन वेचतात असे वागू नका, तसे करू नका म्हणुन उपदेश करणाऱ्या सर्व संताना समाजाकडून विरोध होणे स्वाभाविक आहे. परंतु सदाचार, सद्‌भावना लोककल्याणाची आत्यंतिक तळमळ आणि या सर्वांची अधिष्ठात्री पारलौकिक दृष्टी या बळावर संत लोक सामाजिक विरोधाला यशस्वीपणे तोंड देतात आणि म्हणूनच अशा प्रतिकुल परिस्थितीतून जनसामान्याला जिंकणाऱ्या संताला अवतार मानले जाते.

जगात संताच्या परंपरा निर्माण झाल्या नसत्या तर मानवाला जडमूढा अवस्थेतून बाहेर निघता आले नसते. त्याचा आत्मिक विकास घडून आला नसता मानवाच्या आणि राष्ट्राच्या जीवनाला केवळ भौतिक विकासाने परिपूर्णतः प्राप्त होत नसते. भौतिक विकासाची यशस्विता खऱ्या अर्थाने आत्मिक विकासावर अवलंबून आहे.

संत लोक मानवाला जगाकडे आत्मोपम्य बुद्धीने पाहण्याची शिकवण

देतात 'हे विश्वाचि माझे घर' विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा ही विश्वात्मका किंवा एकात्मता या आत्मोप्यमय बुद्धीची परमोच्या प्रगती म्हणावी लागेल. दुसऱ्याचे दुःख जाणण्याच्या कृतीतून विराट समाज एकसंध होतो अशा विराट व एकसंघ समाज पुरूषाची सर्व कर्मे अनासक्तीतून परहितार्थ अर्पण होत असतात.

संसाराविषयी संताची दृष्टी सर्वस्वी प्रतिकुल असते असे मुळीच नाही परंतु संसारात गुरफटून गेल्यामुळे चित्तवृती विचलीत होतात. अशा संसारावर विजय मिळवून संसारापलिकडे शुद्ध, निरपेक्ष अशा परतत्वाचा अनुभव घेता यावा अशी त्यांची पारमार्थिक दृष्टी असते संसारातील दुःखे कोणालाच चुकत नसतात त्या दुःखावर विजय मिळविता यावा यासाठीच संताचा नैतिक उपदेश असतो. अनुकुल वा प्रतिकुल परिस्थितीत मन विचलीत होवू न देता शांतीस्वरूप आनंद सागरात ते सुस्नात व्हावे यासाठीच त्यांची सारी धडपड असते. परिस्थिती सापेक्ष अशा लौकिक भ्रमण करणाऱ्या व त्यामुळे विचलीत होणाऱ्या मानवी मनाला परिस्थिती निरपेक्ष अशा पारलौकिक सुखाकडे नेऊन चिरशांती प्राप्त करून देणे हेच संत परंपरेचे उद्दीष्ट असते.

संत परंपरेत असलेले तुकारामांचे स्थान

तुका झालेसे कळस

श्री एकनाथांच्या निर्वाणानंतर नऊ वर्षानी म्हणजे इ. स. १६०८ मध्ये तुकारामांचा देहु गावी जन्म झाला. वारकरी संप्रदायात तुकोबानंतर त्यांच्याइतका पारमार्थिक उंची लाभलेला संत झालाच नाही. आणि म्हणुनच त्यांना कळसाची उपमा यथार्थतेने लागु पडते. कळसाचे दर्शन घेतल्यावर ज्याप्रमाणे देवाचे दर्शन घेतल्याचे पुण्य पदरी पडते त्याप्रमाणे केवळ तुक्याचे अभंग वाचल्याने भागवतधर्माचे रहस्य हाती लागते म्हणुनच तुकारामांच्या कार्यास कळसाची उपमा दिली गेली असावी हा प्रा. न. रा. फाटकांचा अभिप्राय मार्मिक आहे.

विठ्ठलभक्ती घराण्यात परंपरेने चालत आलेली, शिवाय ज्ञानदेव व

नामदेवांचा वारसा तुकारामांना मिळालेला त्यांच्या अभंगगाथेत ज्ञानेश्वरी भागवताचे रहस्य साररूपाने आणि समाजातील सर्वात खालच्या थरापर्यंत जावुन भिनेल अशा तऱ्हेने व्यक्त झाले आहे.

सर्वसामान्य माणसाची कुवत पाहुन त्यांच्यापर्यंत अध्यात्मविचार सोपे करून पोहचविण्याचे तुकोबांचे कार्य वारकरी संप्रदायात अद्वितीय आहे.

तुकोबांचे काव्य पराकाष्ठाचे आत्मपर आणि अंर्तमुख असल्यामुळे त्यात त्यांच्या पारमार्थिक जीवनचरित्राचे दर्शन घडतेच परंतु त्याचबरोबर त्यांच्या सामाजिक मताचे प्रतिसादही त्यात उमटलेले दिसतात.

सामान्यांच्या पारमार्थिक प्रगतीच्या आड येणारा जन्मसिद्ध उच्चनीच भाव, धार्मिक क्षेत्रातील मिरासदारी आणि परंपरागत नीतीमुल्ये यावर तुकाराम जेव्हा वज्रादीप कठोर प्रहार करतात तेव्हा त्यांची कर्त्या सुधारकाची भूमिका व्यक्त होते.

अणुरणीया थोडका । तुका आकाशाएवढा ।।

अशी सर्वात्मक भावना ज्या भक्तीतून प्राप्त झाली. त्याभक्तीचे महात्म्य तुकोबा परोपरीने गातात त्यांचा भक्तिमार्ग कर्मप्रधान आहे त्यात संन्यासाला थारा नाही. उत्कट भक्तितून आत्मसाक्षात्कार हेच वेदांताचे सार त्यांच्या अनुभवाला आल्यामुळे

' वेदांचा तो अर्थ आम्हासचि ठावा । येरांनी वाहवा भार माथा ।।

असे आत्मविश्वासाने म्हणतात.

नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ, या तिघांच्याही जीवनाचा आणि वाङ्मयाचा परिणाम तुकोबांवर झाला होता. नामदेवांनी तर स्वप्नात विठ्ठलासह येवुन आपले अभंग निर्मितीचे आणि विठ्ठलाच्या भक्तीचे प्रसाराचे कार्य पुरे करण्यास व पुढे चालविण्यास तुकोबांना सांगितले.

नामदेव आणि तुकोबा दोघेही संसारी आणि कुटुंबवत्सल होते पण दोघांनीही आपल्या वैयक्तिक संसाराकडे पाठ फिरवली आणि भक्ती व दया क्षमा शांतीच्या प्रसाराला आयुष्य वाहिले अशा रीतीने देवपिसे किंवा ध्येयवेडे झालेल्या थोर लोकांचे संसार उध्वस्त होतात. आणि पराकाष्ठेच्या दारिद्रयात त्यांना दिवस

काढावे लागतात पण लोक कल्याणार्थ खऱ्या धर्माच्या प्रचाराचे कार्य करीत असणारे नामदेव व तुकोबासारखे सत्पुरूष हे हाल आनंदाने सोसतात. नामदेवांचे कार्य अभंग रचनेच्याद्वारे पुढे चालविल्यामुळे " नामाचा तुका " ही म्हण रूढ झाली असली तरी तुकोबांनी इतरांना आपले संसार हिंमतीने करण्यास सांगितले आणि भक्तीमार्गात व संसारात प्रयत्नवादाचा पुरस्कारच केला आहे.

भागवत धर्माचे आदिपीठ म्हणुन पंढरपुर प्रमाणेच आळंदीही तुकोबांना प्रिय होती. तुकोबा हे जातीने कुणबी आणि वर्णाने वैश्य होते त्यामुळे ते द्विजन्मे होते. द्विजांना एक जन्मदाता पिता व दुसरा विद्यादाता पिता असतो ज्ञानेश्वर हे तुकोबाचे ब्रम्हविद्यादाते पिता होते.

ज्ञानेश्वर,, नामदेव, एकनाथ यांनी पुरस्कृत केलेला भागवत धर्म आपल्या उस्फूर्त अभंगाच्या द्वारे समाजातील अगदी खालच्या थरापर्यंत नेण्याचे श्रेय तुकोबांना दिले जाते. तुकोबांची ज्ञानेश्वर समान योग्यता महाराष्ट्राने ओळखली होती. म्हणूनच या दोन्ही सत्पुरूषांच्या नावाचा ज्ञानदेव तुकाराम असा एकत्र जयघोष वारकरी संप्रदायाच्या किर्तनात घडतो.

एकनाथी भागवताची तर त्यांनी पारायणे केली होती आणि त्याच्या आधारे मूळ भागवतातही प्रवेश केला होता.

एकनाथ हे तुकोबाच्या जीवनाचेही जीवन झाले होते. ज्ञानदेव, नामदेव व एकनाथ यांच्याशी तुकोबांचे असलेले नाते वै. लाड यांचे त्याविषयाची मत नामदेव, ज्ञानदेव व एकनाथ हे त्यांचे जीवाभावाचे आवडते सांगाती. त्यांच्या पंगतीच्या एकांतात साहजिकच त्याला काळावेळाचे भान राहत नसे. ज्ञानेश्वराला त्यांनी पितृस्थानी स्थापिले आहे. इतके सांगितले तरी पुरे त्या ज्ञानी बापाने त्यांना भातुके दिले होते म्हणून त्याला कौतुकाची शब्दक्रीडा करता आली.

त्या सिद्ध महाराजांच्या पायाशी तो इतका शिकला व इतका पारंगत झाला की ज्ञानेश्वरांनी धरणेकऱ्याला त्याच्याकडे उपदेश घेण्यास पाठविले.

पंढरी माझे माहेर साजणी ।

ओविया काढणी गाऊ गीत

या ओविया गाताना नामदेवास जिवलगा माझिया नामदेवा म्हणुन त्याने गाढ सख्याच्या भावाने आळविले नामदेव तुकारामांच्या मनी वसत म्हणूनच ते त्यांना स्वप्नी दिसले.

नामदेवांच्या काव्याशी व कार्याशी ते इतके तादात्म्य पावले होते नामदेवा इतकेच किंबहुना थोडे आधिकच एकनाथांनी त्यांचे जीवन व्यापीले होते.

भगवान श्रीकृष्णाच्या भागवतधर्माचा संदेश ज्ञानदेव नामदेव एकनाथ परंपरा पुढे चालवुन सोप्या व सुगमय भाषेत सुलभ दृष्टांतानी महाराष्ट्रातील खेडयापाडयातील जनतेपर्यंत पोहचविण्याचे महान कार्य तुकाराम महाराजानी केले साधक अवस्थेत चारी भिंतीतून कोंडलेल्या घरातुन आणि क्षुद्र व संकुचित लौकिक व्यवहारातून बाहेर पडून उंच डोंगरावर निसर्गाच्या सानिध्यात आकाशाच्या आच्छादनाखाली पृथ्वीच्या आसनावर बसुन त्यांनी साधना केली. गीता भागवताचा सखोल अभ्यास केला. निर्भय आत्परीक्षण केले प्रयत्नवादाचे ते मुर्तीमंत अवतार होते. इश्वरी दर्शनाच्या तीव्र तळमळीने व दृढ निश्चयाने ते विठ्ठलभक्तीच्या मार्गाला लागले आणि याचदेही याचडोळा त्यांनी इश्वराचे साक्षात दर्शन घेतले साक्षात्कारी संताच्या मालीकेत त्यांचे स्थान मोठे आहे. या साक्षात्काराने त्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला. ऐहिक्य – परस्त्री ऐहिक आणि पारलौकीक या दोन्ही क्षेत्रात मनुष्यांला विजय करणाऱ्या भागवत धर्माच्या रक्षणासाठी आपला जन्म आहे याची जाणीव त्यांना झाली ते उपकारापुरते उरले आणि धर्मरक्षणाकरीता त्यांनी आमरण जीवाची आटी केली " जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुला तो खरा साधु या न्यायाने सामाजिक समतेचा पुरस्कार केला. आणि दया तिचे नाव भूतांचे पालन आणि निर्दलन कंटकाचे" अशी दयेची निर्भिड व्याख्या त्यांनी केली.

तुकाराम महारांजाची अभंगवाणी उर्जस्वल होती तीत दुबळेपणाचा लेशही नव्हता. त्याची प्रासादिक वाणी जितकी प्रांजल तितकी फटकळही आहे. समाजातील ढोंग,

दंभ, विषमता, निदर्यता त्यांच्यावर ते तुटून पडतात. दुर्जनांना ते पंचानन आहेत.

" ज्ञानोबा तुकाराम या भजनाने तुकोबांना ज्ञानदेवांच्या पंक्तीला बसवुन महाराष्ट्राने त्याचे यथार्थ मुल्यमापन केले आहे.